अहवाल

कला व सांस्कृतिक विभाग २०२३-२४

युवक महोत्सव नियोजन कार्यशाळा

विद्यार्थी विकास विभाग मुंबई विद्यापीठ मुंबई आणि शांताराम भाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीराम भाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय शिवळे यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. ८ जुलै २०२३ रोजी मुंबई विद्यापीठाच्या 56 व्या युवक महोत्सवाच्या नियोजनाकरिता एक दिवशीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेला झोन क्र. ६. ठाणे /पालघर ग्रामीण मधील १५ महाविद्यालयातून सांस्कृतिक विभागप्रमुख आणि २१ विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यशाळेचे उद्‌घाटन जनसेवा शिक्षण मंडळाचे सचिव मा. पांडुरंग कोर साहेब यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी संस्थेचे संचालक मा. मुरलीधर दळवी साहेब, ठाणे /पालघर झोनचे सहसमनमयक डॉ. धुमाळ, प्रा. श्रीमती कवठेकर महाविद्यालयाचे प्रा. प्राचार्य डॉ. गीता विशे उपस्थित होते. या कार्यक्रमात ईशस्तवन कु. ललिता देसले आणि भाग्यश्री कापडे यांनी गायले. या कार्यशाळेत मुंबई विद्यापीठ युवक महोत्सव समन्वयक निलेश सावे आणि त्यांची संपूर्ण टीम यांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा पाच सत्रात संपन्न झाली. कार्यशाळेच्या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक यशवंतराव यांनी केले; तर निमंत्रक म्हणून प्रा.एम. व्ही. पवार यांनी काम पाहिले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग आणि कर्मचारी यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा पार पडली.

प्रा. एम. व्ही पवार

कला व सांस्कृतिक विभाग प्रमुख